पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.
मा.स्थायी समिती
**कार्यपत्रिका क्रमांक – ६९**
(सभावृत्तांत)

दिनांक – २७/०६/२०१८ वेळ – दुपारी २.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची साप्ताहिक सभा बुधवार, दिनांक २७/०६/२०१८ रोजी दुपारी २.०० वाजता महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा.ममता विनायक गायकवाड - सभापती
२. मा. मोरेश्वर महादू भोंडवे
३. मा.राजू मिसाळ
४. मा.अमित राजेंद्र गावडे
५. मा.गावडे राजेंद्र तानाजी
६. मा.आंगोळकर सागर सुनिल
७. मा.करुणा शेखर चिंचवडे
८. मा. लोंढे नम्रता योगेश
९. मा.मडिगेरी विलास हनुमंतराव
१०. मा. गीता सुशिल मंचरकर
११. मा.खानोलकर प्रज्ञा महेश
१२. मा.लांडगे सारिका संतोष
१३. मा.बोईनवाड यशोदा प्रकाश
१४. मा.डोळस विकास हरिश्चंद्र
१५. मा.बारणे अर्चना तानाजी
१६. मा.साधना अंकुश मळेकर

याशिवाय मा.श्रावण हर्डिकर – आयुक्त, मा. आष्टीकर - अतिरिक्त आयुक्त (१) मा.गावडे - अतिरिक्त आयुक्त (२) मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.कुंभोजकर - मुख्यलेखापरिक्षक, मा.चव्हाण - शहर अभियंता, मा.डॉ.अनिल रॉय - आरोग्य वैद्यकीय अधिकारी, मा.ठाकूर -

उपसंचालक नगररचना, मा.लांडे – मुख्य लेखापाल, मा.तुपे – सह शहर अभियंता, मा.चितळे, मा.खोराटे, मा. झगडे, मा.दुरगुडे, मा.इंदलकर, मा.राऊत, मा.बोदडे, मा.खोत - सहाय्यक आयुक्त, मा.पाटील – प्रचार्य, औ.प्र.कें., मा.निकम, मा.सवणे, मा.तांबे, मा.लडकत, मा.जुंधारे, मा.गलबले, मा.घोडे, मा.कांबळे, मा.ओंभासे, मा.गट्टुवार, मा.पुजारी, मा.गायकवाड, मा.पाटील, मा.घुबे, मा.चव्हाण - कार्यकारी अभियंता, मा.दगडे – पशुवैद्यकिय अधिकारी, मा.जगताप - कामगार कल्याण अधिकारी, मा.दांगट, मा.आगळे – प्रशा.अधिकारी, मा.लावंड – कायदा अधिकारी, मा.कोटलवार – माहिती तंत्रज्ञान अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

**उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजामध्ये दाखल करून घेणेत आले –**

विषय क्र.१८) मा.स्थायी समिती ठराव क्र.२४८५, दि.२१/३/२०१८ मध्ये दुरूस्तीबाबत.
मा.विलास मडिगेरी, मा.करूणा चिंचवडे यांचा प्रस्ताव

विषय क्र.१९) प्रभाग क्र.१९ (नविन प्र.क्र.१६) पेठ क्र.२९ येथे फुटबॉल ग्राऊंड करणे या कामास प्रकल्प सल्लागार नेमणेबाबत. मा.विकास डोळस, मा.राजू मिसाळ यांचा प्रस्ताव

विषय क्र.२०) पिंपरी चिंचवड शहरातील नागरीकांच्या सहभागाद्वारे शहराची नविन ओळख निर्माण करणेसाठी शहर परिवर्तन कार्यालयामार्फत सर्वेक्षण कामकाजासाठी मानधन अदा करणेकामी मान्यता मिळणेबाबत.

विषय क्र.२१) City Transformation Officeचे होणा-या कार्यशाळेच्या खर्चास मान्यता मिळणेबाबत.

विषय क्र.२२) आषाढी वारी पालखी सोहळा वारक-यांना मोफत वैद्यकिय सुविधा पुरविणेबाबत.

विषय क्र.२३) पंतप्रधान आवास योजनेअंतर्गत मौजे आकुर्डी येथील आरक्षण क्र.२८३ बेघरांसाठी घरे (HDH) येथील जागेवर आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी (EWS) घरकुल योजना राबविणे प्रकल्पास Environmental Clearance घेणेबाबत.

विषय क्र.२४) JnNURM-BSUP शहर झोपडपट्टी पुनर्वसन अंतर्गत लिंकरोड पत्राशेड, चिंचवड येथे ६७२ गाळे बांधणे या प्रकल्पास Environmental Clearance घेणेबाबत.

विषय क्र.२५) पंतप्रधान आवास योजनेअंतर्गत मौजे रावेत सनं.९६पै, आरक्षण क्र.४/१०२ येथील जागेवर आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी (EWS) घरकुल योजना राबविणे प्रकल्पास Environmental Clearance घेणेबाबत.

विषय क्र.२६) वित्तीय अधिकार प्रदान करणेबाबत. (दुरूस्ती)

विषय क्र.२७)चिखली नर्सरी व से.नं.२७ या ठिकाणी मनपा ने पुरविलेल्या १०*१६ व ५*६ पिशव्या मध्ये शेडमध्ये माती भरून ५० ते १०० मीटरवर असणा-या बेडमध्ये व्यवस्थित लावुन देणेबाबत.

विषय क्र.२८) शालेय साहित्य खरेदीबाबत. मा. राजेंद्र गावडे, मा.राजू मिसाळ यांचा प्रस्ताव

विषय क्र.२९) मा.स्थायी समिती ठराव क्र.२८०१ दि.१३/६/२०१८ मध्ये दुरूस्तीबाबत.
मा.सागर आंगोळकर, मा.विलास मडिगेरी यांचा प्रस्ताव

---------

दिनांक १९/०६/२०१८ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक ६८) चा सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

---------

ठराव क्रमांक -२८३५ विषय क्रमांक - ०१
दिनांक – २७/०६/२०१८ विभाग – लेखा विभाग
सूचक – मा.राजेंद्र गावडे अनुमोदक – मा.विलास मडिगेरी
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.लेखा/१५/कावि/६९६९/२०१८ दि.१३/०६/२०१८

विषय - आधारनिधी व मागासवर्गीय कल्याणकारी निधीचे चे खाते बंद करून उपलब्ध शिल्लक रक्कम सर्वसाधारण निधीकडे वर्ग करणेबाबत.

विषय क्र.१ चा विचार पुढील सभेच्या वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२८३६ विषय क्रमांक - ०२
दिनांक – २७/०६/२०१८ विभाग – मध्यवर्ती भांडार विभाग
सूचक – मा.सागर आंगोळकर अनुमोदक – मा.विकास डोळस
संदर्भ – मा.सहा. आयुक्त (भांडार) यांचे जा.क्र.मभां/०८/कावि/७२६/२०१८ दि.२१/०५/२०१८

मा.सहा. आयुक्त (भांडार) यांनी शिफारस केले प्रमाणे –

मनपाचे करआकारणी व करसंकलन विभागास सन २०१८-१९ या आर्थिक वर्षाकरीता आवश्यक मनपा नमुन्या प्रमाणे प्रिप्रिंटेड मिळकतकर बिले छपाई करुन खरेदीबाबत मध्यवर्ती भांडार विभागाने ई निविदा सु.क्र.५६/२०१७-१८ अन्वये मे.जय गणेश ऑफसेट, पुणे यांचे लघुत्तम दर प्रती नग र.रु.१.६४ प्रमाणे १०,५०,००० मिळकतकर बिले छपाईकामी एकुण र.रु.१७,२२,०००/- मध्ये खरेदी करणेस मा.सहाय्यक आयुक्त (भांडार) यांनी मान्यता दिलेली आहे. त्यानुसार मे.जयगणेश ऑफसेट, पुणे यांचेकडील लघुत्तम दर एकुण र.रु.१७,२२,०००/- (अक्षरी र.रु.सतरा लाख बावीस हजार फक्त) मध्ये मिळकतकर बिले छपाई करुन पुरविणेकामी पुरवठा आदेश निर्गत करणेत आलेला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२८३७ विषय क्रमांक - ०३
दिनांक – २७/०६/२०१८ विभाग – मध्यवर्ती भांडार विभाग
सूचक – मा.विकास डोळस अनुमोदक – मा.राजेंद्र गावडे
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मभां/०६/कावि/२४७/२०१८ दि.०५/०६/२०१८

विषय – मनपाचे विद्युत विभागासाठी आवश्यक विविध प्रकारचे केबल्स आणि वायर्स साहित्य खरेदीबाबत.

विषय क्र.३ चा विचार पुढील सभेच्या वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२८३८ विषय क्रमांक - ०४
दिनांक – २७/०६/२०१८ विभाग – मध्यवर्ती भांडार विभाग
सूचक – मा.नम्रता लोंढे अनुमोदक – मा.यशोदा बोईनवाड
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मभां/०६/कावि/२४८/२०१८ दि.०५/०६/२०१८

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

मनपाचे विद्युत विभागासाठी १०० व्हॅट एलईडी स्ट्रीट लाईट फिटींग साहित्य खरेदीकामी ई निविदा सुचना क्र.३६/२०१७-१८ अन्वये, ऑनलाईन निविदा दर मागविणेत आले होते. यानुसार सदर निविदे करीता एकुण पाच निविदाकार प्राप्त झाले. त्यामधील लघुत्तम निविदाकार मे.रूपलक्ष्मी इलेक्ट्रीकल्स यांचे दर पत्रकातील बाब क्र.१ या साहित्याचे लघुत्तम प्रति नग दर र.रू.४,०६६/- प्रमाणे एकुण लघुत्तम दर र.रू.३५,३७,४२०/- (अक्षरी र.रू. पस्तीस लाख सदोतीस हजार चारशे वीस फक्त) हे अंदाजपत्रकीय दरापेक्षा १३.६४% ने कमी असल्याने स्विकृत करून त्यांचेबरोबर करारनामा करुन पुरवठा आदेश निर्गत करणेस व येणा-या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२८३९ विषय क्रमांक - ०५
दिनांक – २७/०६/२०१८ विभाग – दूरसंचार विभाग
सूचक – मा.अर्चना बारणे अनुमोदक – मा.साधना मळेकर
संदर्भ – मा.अतिरिक्त आयुक्त यांचे जा.क्र.दुरसंचार/१/कावि/६०/२०१८ दि.११/०६/२०१८

मा.अतिरिक्त आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

श्रीम.जोत्सना शिंदे, शिक्षण मंडळाच्या प्रशासन अधिकारी यांस कार्यालयीन

कामकाजासाठी मोबाईल सिम सुविधा व ३जी /४जी डोंगल सुविधा पूरविणेस तसेच मोबाईल वापराची अधिकतम मासिक मर्यादा र.रू.५००/- (अक्षरी र.रू. पाचशे फक्त) निश्चीत करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२८४० विषय क्रमांक - ०६

दिनांक – २७/०६/२०१८ विभाग – इ क्षेत्रीय, स्थापत्य

सूचक – मा.विलास मडिगेरी अनुमोदक – मा.राजेंद्र गावडे

संदर्भ – मा.अतिरिक्त आयुक्त (१) यांचे जा.क्र.इस्था/कावि/५४२/२०१८ दि.५/०६/२०१८

मा.अतिरिक्त आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या तांत्रिक सल्लागार नेमणुकीबाबतच्या समितीची बैठक दि.२४/०४/२०१८ रोजी मा.शहर अभियंता यांच्या कार्यालयात झालेली आहे. सदर बैठकीमध्ये मे.नियोजन कन्सल्टंट यांनी खालील प्रमाणे अ.क्र.१ ते ३ कामाचे सादरीकरण केलेले आहे.

१) प्रभाग क्र.३ च-होली येथील स.क्र.१३१ येथील आय.टु.आर.च्या बदल्यात ताब्यात आलेल्या मनपाच्या जागेवरील जलतरण तलावाचे स्थापत्य विषयक काम करणे (टप्पा - २)

२) प्रभाग क्र.३ च-होली येथील आरक्षण क्र.२/८९ खेळाचे मैदान विकसित करणे व स्थापत्य विषयक कामे करणे. (टप्पा - २)

३) प्रभाग क्र.७ भोसरी गावठाणातील स.नं.१ कबडडी प्रशिक्षण केंद्र विकसित करणे व अनुषंगिक कामे करणे.

सदर सादरीकरण समाधानकारक असल्याने छाननी समितीने त्यास मान्यता देवुन स्वीकारण्यात आलेले आहे. सबब सदर कामास सल्लागार म्हणुन मे.नियोजन कन्सल्टंट यांची नियुक्ती करणे आवश्यक आहे. सदर कामांसाठी सल्लागार म्हणुन करावयाच्या कामाच्या व्याप्तीमध्ये प्रस्तुत कामांचे पुर्वगणक पत्र तयार करणे व निविदा बनविणे तसेच कामांवरदेखरेख करणे इ. निविदा पुर्व (Pretender) व निविदा पश्चात (Post Tender) इ. कामे करावी लागणार आहेत. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमध्ये विविध प्रकल्पासाठी सल्लागार म्हणुन मे.नियोजन कन्सल्टंट यांची नियुक्ती केलेली आहे. मे.नियोजन कन्सल्टंट यांनी यापुर्वी देखील अशा प्रकारची कामे यशस्वी रित्या पुर्ण केलेली आहे व सध्या देखील चालु आहेत. मनपाच्या मा.स्थायी समिती ठराव क्र.२१३९ व दि.७/०२/२०१८ अन्वये केलेल्या Empanelment मध्ये मे.नियोजन कन्सल्टंट यांचा समावेश आहे. उपरोक्त बाबींचा विचार करता उपरोक्त नमुद केलेल्या १ ते ३ कामांसाठी

मे.नियोजन कन्सल्टंट यांची सल्लागार म्हणुन नेमणुक करणेचा प्रस्ताव तसेच निविदा पुर्व (Pretender) व निविदा पश्चात (Post Tender) कामांसाठी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणुन नेमणुक करणेस व मनपाचे प्रचलित दरानुसार फी अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२८४१ विषय क्रमांक - ०७

दिनांक – २७/०६/२०१८ विभाग – इ क्षेत्रीय, स्थापत्य

सूचक – मा.विकास डोळस अनुमोदक – मा.सागर आंगोळकर

संदर्भ – मा.अतिरिक्त आयुक्त (१) यांचे जा.क्र.इस्था/कावि/५४४/२०१८ दि.५/०६/२०१८

मा.अतिरिक्त आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या तांत्रिक सल्लागार नेमणुकीबाबतच्या समितीची बैठक दि.२४/०४/२०१८ रोजी मा.शहर अभियंता यांच्या कार्यालयात झालेली आहे. सदर बैठकीमध्ये मे.एन्हायरो सेफ कन्सल्टंट यांनी खालील प्रमाणे अ.क्र.१ ते ४ कामाचे सादरीकरण केलेले आहे.

१) प्रभाग क्र.६ मोशी येथे अग्निशामक कैंद्र बांधणे.
२) प्रभाग क्र.३ येथील पुणे नाशिक रस्ता ते स.क्र.५७५, ६६४, ५०८, ५०६ पर्यंतचा ३० व १८ मी.डी.पी.रस्ता विकसित करणे.
३) प्रभाग क्र.३ च-होली येथील चोविसावाडी येथे अग्निशमन कैंद्र बांधणे.
४) प्रभाग क्र.३ च-होली येथील स.क्र.११० ते स.क्र.१०० मनपा हद्दीपर्यंतचा ३० मी. डी.पी.रस्ता विकसित करणे. (टप्पा - २)

सदर सादरीकरण समाधानकारक असल्याने छाननी समितीने त्यास मान्यता देवुन स्वीकारण्यात आलेले आहे. सबब सदर कामास सल्लागार म्हणुन मे.एन्हायरो सेफ कन्सल्टंट यांची नियुक्ती करणे आवश्यक आहे. सदर कामांसाठी सल्लागार म्हणुन करावयाच्या कामाच्या व्याप्तीमध्ये प्रस्तुत कामांचे पुर्वगणक पत्र तयार करणे व निविदा बनविणे तसेच कामांवर देखरेख करणे इ. निविदा पुर्व (Pretender) व निविदा पश्चात (Post Tender) इ. कामे करावी लागणार आहेत. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमध्ये विविध प्रकल्पासाठी सल्लागार म्हणुन मे.एन्हायरो सेफ कन्सल्टंट यांची नियुक्ती केलेली आहे. मे.एन्हायरो सेफ कन्सल्टंट यांनी यापुर्वी देखील अशा प्रकारची कामे यशस्वी रित्या पुर्ण केलेली आहे व सध्या देखील चालु आहेत. मनपाच्या मा.स्थायी समिती ठराव क्र.२१३९ व दि.७/०२/२०१८ अन्वये केलेल्या Empanelment मध्ये मे.एन्हायरो सेफ कन्सल्टंट यांचा समावेश आहे. उपरोक्त बाबींचा विचार करता उपरोक्त नमुद केलेल्या १ ते ४ कामांसाठी मे.एन्हायरो सेफ कन्सल्टंट यांची सल्लागार म्हणुन नेमणुक करणेचा प्रस्ताव तसेच

निविदा पुर्व (Pretender) व निविदा पश्चात (Post Tender) कामांसाठी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणुन नेमणुक करणेस व मनपाचे प्रचलित दरानुसार फी अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२८४२ विषय क्रमांक - ०८

दिनांक – २७/०६/२०१८ विभाग – इ क्षेत्रीय, स्थापत्य

सूचक – मा.सारिका लांडगे अनुमोदक – मा.नम्रता लोंढे

संदर्भ – मा.अतिरिक्त आयुक्त (१) यांचे जा.क्र.इस्था/कावि/५४६/२०१८ दि.५/०६/२०१८

मा.अतिरिक्त आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या तांत्रिक सल्लागार नेमणुकीबाबतच्या समितीची बैठक दि.२४/०४/२०१८ रोजी मा. शहर अभियंता यांच्या कार्यालयात झालेली आहे. सदर बैठकीमध्ये मे.अँशुअर्ड इंजिनिअरिंग सर्व्हिसेस यांनी खालील नमुद प्रमाणे १ ते ४ कामाचे सादरीकरण केलेले आहे.

१) च-होली येथील स.क्र २५४ ते २२८ पर्यंतचा १२ मी.रस्ता विकसित करणे.
२) प्रभाग क्र.३ चोविसावाडी येथील स.क्र.१५ ते च-होली स.क्र.९४० पर्यंतचा १८ मी.डी.पी.रस्ता विकसित करणे.
३) प्रभाग क्र.३ मोशी आळंदी रस्ता ते डूडूळगाव गावठाणापर्यंतचा १८ मी. डी.पी.रस्ता विकसित करणे.
४) प्रभाग क्र.३ च-होली स.नं.७ ते मनप हद्दीपर्यंतच्या विकास आराखडयातील ३० मी. रस्ता विकसित करणे.

सदर सादरीकरण समाधानकारक असल्याने छाननी समितीने त्यास मान्यता देवुन स्वीकारण्यात आलेले आहे. सबब सदर कामास सल्लागार म्हणुन मे.अँशुअर्ड इंजिनिअरिंग सर्व्हिसेस यांची नियुक्ती करणे आवश्यक आहे. सदर कामांसाठी सल्लागार म्हणुन करावयाच्या कामाच्या व्याप्तीमध्ये प्रस्तुत कामांचे पुर्वगणक पत्र तयार करणे व निविदा बनविणे तसेच कामांवर देखरेख करणे इ. निविदा पुर्व (Pretender) व निविदा पश्चात (Post Tender) इ. कामे करावी लागणार आहेत. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमध्ये विविध प्रकल्पासाठी सल्लागार म्हणुन मे.अँशुअर्ड इंजिनिअरिंग सर्व्हिसेस यांची नियुक्ती केलेली आहे. मे.अँशुअर्ड इंजिनिअरिंग सर्व्हिसेस यांनी यापुर्वी देखील अशा प्रकारची कामे यशस्वी रित्या पुर्ण केलेली आहे व सध्या देखील चालु आहेत. मे.अँशुअर्ड इंजिनिअरिंग सर्व्हिसेस यांना रस्ते महामार्गाचे सविस्तर प्रकल्प तयार करणेचाही अनुभव आहे. मनपाच्या मा.स्थायी समिती ठराव क्र.२१३९ व दि.७/०२/२०१८

अन्वये केलेल्या Empanelment मध्ये मे.अँशुअर्ड इंजिनिअरिंग सर्व्हिसेस यांचा समावेश आहे. उपरोक्त बाबींचा विचार करता उपरोक्त नमुद केलेल्या १ ते ४ कामांसाठी मे.अँशुअर्ड इंजिनिअरिंग सर्व्हिसेस यांची सल्लागार म्हणुन नेमणुक करणेचा प्रस्ताव तसेच निविदा पुर्व (Pretender) व निविदा पश्चात (Post Tender) कामांसाठी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणुन नेमणुक करणेस व मनपाचे प्रचलित दरानुसार फी अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२८४३ विषय क्रमांक - ०९

दिनांक – २७/०६/२०१८ विभाग – शिक्षण मंडळ

सूचक – मा.विकास डोळस अनुमोदक – मा.सागर आंगोळकर

संदर्भ – मा.अतिरिक्त आयुक्त यांचे जा.क्र.शिमं/९अ/कावि/५६/२०१८ दि.१८/०६/२०१८

मा.अतिरिक्त आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या शिक्षण विभागाकडील आणि प्राथमिक शाळांतील संगणक यंत्रण देखाभाल दुरुस्तीसाठी ऑनलाइन निविदा सुचना क्र.०२/२०१७-१८ अन्वये लघुत्तम निविदाकार मे. मोनार्च टेक्नॉलॉजी (पुणे) प्रा.ली. यांचे कडून संगणक देखभाल दुरुस्तीसाठी आणि हार्डवेअर इंजीनिअर नियुक्त करणेकामी र.रु.१२,९१,४६७/- (अक्षरी र.रु. बारा लाख एक्याण्णव हजार चारशे सदुसष्ठ फक्त) या रकमेचे त्यांचे बरोबर करारनामा करुन पुरवठा आदेश निर्गत केले असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२८४४ विषय क्रमांक - १०

दिनांक – २७/०६/२०१८ विभाग – फ क्षेत्रीय कार्यालय

सूचक – मा.अर्चना बारणे अनुमोदक – मा.नम्रता लोंढे

संदर्भ – मा.क्षेत्रीय अधिकारी यांचे जा.क्र.फक्षेका/नि-४/कावि/२७८/२०१८ दि.०५/०५/२०१८

मा.क्षेत्रीय अधिकारी यांनी शिफारस केले प्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या फ क्षेत्रिय कार्यालयाकडील स्थापत्य विभागाचे निविदा कामांच्या सोबतचे प्रपत्र अ मधील (१ ते ५) नियमानुसार व निविदा अटी-शर्ती प्रमाणे लघुत्तम दराच्या निविदा स्विकारणेत आलेल्या असुन मंजुर दराने ठेकेदारास निविदा करारनामा करून कामाचा आदेश देण्यात आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२८४५ विषय क्रमांक - ११
दिनांक – २७/०६/२०१८ विभाग – पाणीपुरवठा विभाग
सूचक – मा.विलास मडिगेरी अनुमोदक – मा.सागर आंगोळकर
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.पापु/६/कावि/१३९६/२०१८ दि.१८/०६/२०१८

मा.महापालिका आयुक्त यांची शिफारस विचारात घेवून

मनपाच्या पाणीपुरवठा विभागाच्या नि.नो.क्र.३१/१६/२०१७-१८ अन्वये सन २०१७-१८ करिता प्रभाग क्र.४३ मध्ये जुन्या पाईपलाईन बदलून नवीन पाईपलाईन टाकणेकामी मे.सुरज कॉन्ट्रक्टर निविदा रक्कम रू.३०,८१,२३२/- (अक्षरी र.रू.तीस लाख एक्याऐंशी हजर दोनशे बत्तीस फक्त) पेक्षा १७.९९% कमी दराने या ठेकेदाराकडून निविदा मंजूर दराने र.रु.२५,२६,९१८/- पर्यंत काम करुन घेणेस तसेच नियमानुसार व निविदा अटीप्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरीयलच्या निर्धारीत केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांच्याबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२८४६ विषय क्रमांक - १२
दिनांक – २७/०६/२०१८ विभाग – ग क्षेत्रीय कार्यालय
सूचक – मा.यशोदा बोईनवाड अनुमोदक – मा.अर्चना बारणे
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.गक्षेका/आ/३/कावि/२७१/२०१८ दि.१९/०६/२०१८

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरापालिकेच्या कार्यक्षेत्रातंर्गत ग क्षेत्रीय कार्यालयातील कार्यक्षेत्रामध्ये फॉगिंग मशिन रिक्षा टेम्पोमध्ये ठेवून औष्णिक धुरीकरण करणेसाठी निविदा क्र.१/२०१७-१८ नुसार तीन चाकी चार रिक्षा टेम्पो पुरविण्याच्या कामाचे मे.माऊली बेरोजगार सेवा संस्था यांना आदेश देण्यात आलेले आहे. सदर कामकाजासाठी धुरीकरणासाठी वापरण्यात येणा-या एका फॉगिंग मशिनसाठी एक वेळा धुरफवारणी करण्यासाठी ४ लिटर डिझेल व १ लिटर पेट्रोल लागते. याप्रमाणे एक मशिन दैनंदिन ३ वेळा फवारणी करते. अशाप्रकारे दैनंदिन ४ मशिन काम करीत आहेत. तरी दैनंदिन चार मशिनसाठी डिझेल ४८ लिटर व पेट्रोल १२ लिटर लागते. ग क्षेत्रीय कार्यालयाच्या आरोग्य विभागातील कचरा वाहने व कार्यालयीन वाहनासाठी क्षेत्रीय कार्यालया नजीकच्या मे.कोटेश्वर पेट्रोलियम, काळेवाडी यांना मा.आयुक्त सो. यांचेकडील

जा.क्र.गक्षेका/१/२०/२०१७ दि.२२/९/१७ व गक्षेका/३/२८५/२०१७ दि. १०/१०/१७ नुसार र.रु.५ लाख (डिपॉझीट) अनामत देऊन, ग क्षेत्रीय कार्यालयास इंधन पुरवठा करणेचे आदेश देण्यात आलेला आहे. त्यामुळे औष्णिक धुरीकरणाच्या मशिनसाठी इंधन पुरवठा करण्यास त्यांना विचारणा केली असता, त्यांनी दि.२४/०४/२०१७ च्या पत्रान्वये इंधन पुरवठा करण्यास तयार असल्याचे कळविलेले आहे. औष्णिक धुरीकरणासाठी सन-२०१८-१९ च्या अंदाजपत्रकामध्ये औष्णिक धुरीकरणासाठी इंधन खर्च या लेखाशिर्षावर र.रु.१२,००,०००/- इतकी तरतूद करण्यात आलेली आहे.

१) कामाचे नाव :- औष्णिक धुरीकरणाच्या फॉगिंग मशिनसाठी इंधन खर्च

२) निविदा नोटीस क्र. :- १/२०१७-१८ नि.र.रु. ८,५१,३६०/-

३) वाहनांचा दर र.रु. :- प्रतिदिन प्रतिवाहन ५४०/-

४) वाहनांची संख्या :- ०४ तीन चाकी टेम्पो

५) कामाची मुदत :- दि.२३/०४/२०१८ ते २२/०४/२०१९ अखेर

विषयांकित कामांसाठी प्रभागातील नागरिकांच्या आरोग्याच्या हिताच्या दृष्टीने वरील प्रमाणे या कामासाठी प्रति दिन तीन चाकी रिक्षा टोम्पो सायं ४ ते ११ वा. पर्यंत एक वाहन चालक + इंधनासह एकुण ०४ वाहने भाडे तत्वावर पुरविण्यासाठी दि.२३/४/२०१८ ते २२/४/२०१९ अखेर मिळणे व सदर कामकाजासाठी अपेक्षीत अंदाजीत खर्च र.रू.७,००,०००/- या येणारा खर्च ग क्षेत्रीय आरोग्य कार्यालयाकडील "धुरीकरणासाठी वाहने भाड्याने घेणे" या लेखाशिर्षावर खर्ची टाकणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२८४७ विषय क्रमांक - १३

दिनांक – २७/०६/२०१८ विभाग – मुख्य लेखा परिक्षण

सूचक – मा.नम्रता लोंढे अनुमोदक – मा.सारिका लांडगे

संदर्भ – मा.मुख्य लेखा परिक्षक यांचे जा.क्र.मुलेप/६/कावि/११०/२०१८ दि.१८/०६/२०१८

मा.मुख्य लेखा परिक्षक यांनी शिफारस केले प्रमाणे –

महाराष्ट्र महापालिका अधिनियम मधील कलम १०५(१) अन्वये लेखापरिक्षण विभागाकडील माहे मे २०१८ अखेर संपणारा मासिक गोषवारा मा.मुख्यलेखा परिक्षक यांनी क्र.मुलेप/६/कावि/११०/२०१८ दि.१८.०६.२०१८ अन्वये पाठविलेल्या अहवालाचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२८४८ विषय क्रमांक - १४

दिनांक – २७/०६/२०१८ विभाग – मुख्य लेखा परिक्षण

सूचक – मा.विकास डोळस अनुमोदक – मा.सागर आंगोळकर

संदर्भ – मा.मुख्य लेखा परिक्षक यांचे जा.क्र.मुलेप/६/कावि/१११/२०१८ दि.१८/०६/२०१८

मा.मुख्य लेखा परिक्षक यांनी शिफारस केले प्रमाणे –

महाराष्ट्र महापालिका अधिनियम मधील कलम १०५(१) अन्वये लेखापरिक्षण विभागातील दि.०४/०६/२०१८ ते दि.१०/०६/२०१८ अखेर संपणा-या आठवड्याचा मा.मुख्य लेखा परिक्षक यांनी क्र.मुलेप/६/कावि/१११/२०१८ दि.१८/०६/२०१८ अन्वये पाठविलेल्या साप्ताहिक लेखा तपासणी कामाच्या अहवालाचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२८४९ विषय क्रमांक - १५

दिनांक – २७/०६/२०१८ विभाग – ग क्षेत्रीय कार्यालय

सूचक – मा.विलास मडिगेरी अनुमोदक – मा.राजेंद्र गावडे

संदर्भ – मा.क्षेत्रीय अधिकारी यांचे जा.क्र.गक्षेका/आ/४/कावि/३३७/२०१८ दि.२०/०६/२०१८

मा.क्षेत्रीय अधिकारी यांनी शिफारस केले प्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरापालिकेच्या कार्यक्षेत्राअतंर्गत ग क्षेत्रीय कार्यालयाच्या कार्यक्षेत्रामध्ये स्ट्रॉर्म वॉटर चेंबर्स साफसफाई करुन निघालेला गाळ व कचरा मोशी कचरा डेपो येथे खाली करणेसाठी निविदा क्र.१/२०१८-१९ नुसार निविदा तयार करण्यात आलेले आहे. ग क्षेत्रीय कार्यालयाच्या कार्यक्षेत्रामध्ये स्ट्रॉर्म वॉटर चेंबर्स एकुण ९७८ चेंबर्स आहेत. तरी प्रति चेंबर्स नुसार दर मागविणेत आलेले असून, मे.संत गाडगेबाबा बेरोजगार संस्था यांनी अंदाजपत्रकीय दराच्या २८.९८% कमी दराने दर सादर केलेला आहे. स्ट्रॉर्म वॉटर व पावसाळी चेंबर्स साफसफाई करणेसाठी सन - २०१८-१९ च्या अंदाजपत्रकामध्ये स्ट्रॉर्म वॉटर पावसाळी गटर सफाई करणे या लेखाशिर्षावर र.रु.२०,००,०००/- इतकी तरतूद करण्यात आलेली आहे. तरी स्ट्रॉर्म वॉटर चेंबर्स साफसफाई करुन निघालेला गाळ व कचरा मोशी कचरा डेपो येथे खाली करणेच्या कामास व येणा-या अपेक्षित अंदाजीत र.रु.२,८७,५३२/- (अक्षरी र.रू. दोन लाख सत्याऐंशी हजार पाचशे बत्तीस फक्त) खर्चास तसेच सदरचा खर्च स्ट्रॉर्म वॉटर पावसाळी गटर सफाई करणे या लेखाशिर्षावर खर्ची टाकणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२८५० विषय क्रमांक - १६
दिनांक – २७/०६/२०१८ विभाग – स्थापत्य मुख्यालय
सूचक – मा.विकास डोळस अनुमोदक – मा.सागर आंगोळकर
संदर्भ – मा.शहर अभियंता यांचे जा.क्र.स्था/नि/अ-मुख्य/०३/२०१८ दि.१८/०६/२०१८

मा.शहर अभियंता यांनी शिफारस केले प्रमाणे –

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.९६/०२/२०१७-१८ प्रभाग क्र.१० तुळजाईवस्ती व विवेकनगर मध्य भागात नविन पेव्हिंग ब्लॉक बसविणेकामी M/s.SHIVAM ENTERPRISES D.M. नि.र.रू.३६,४१,४५१/-(अक्षरी र.रू.छत्तीस लाख एक्केचाळीस हजार चारशे एक्कावन्न फक्त) पेक्षा २३.००% कमी या ठेकेदाराकडुन निविदा मंजुर दराने र.रु.२८,०३,९१८/- पर्यंत काम करुन घेणेस या अटीस अधिन राहुन त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२८५१ विषय क्रमांक - १७
दिनांक – २७/०६/२०१८ विभाग – मध्यवर्ती भांडार विभाग
सूचक – मा.राजेंद्र गावडे अनुमोदक – मा.विलास मडिगेरी
संदर्भ – मा.सहा. आयुक्त (भांडार) यांचे जा.क्र.मभां/०४/कावि/४५१/२०१८ दि.२०/०६/२०१८

मा. सहा. आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

आरोग्य विभागास आवश्यक मॉस्किटो किलींग मशीन खरेदी करणेकामी ई नि.सु.क्र.०२/२०१८-१९ अन्वये प्रसिध्द करुन ऑनलाईन निविदा दर मागविणेत आले होते. त्यानुसार ऑनलाईन तीन निविदाधारकांचे दर प्राप्त झाले आहेत. प्राप्त दरपत्रकामध्ये मे इंद्रनिल टेक्नोलॉजिस, पुणे यांचे मॉस्किटो किलींग मशीन प्रती नग र.रु.2,15,000/- एक वर्ष देखभाल दुरूस्ती सह 04 नगासाठी साठी एकुण र.रु.8,60,000/- (अक्षरी र.रु.आठ लाख साठ हजार फक्त) इतका खर्च येणार आहे. प्राप्त लघुत्तम दर स्विकृत करणेस मान्यता दिलेली असुन लघुत्तम निविदाकार यांचेबरोबर विहीत नमुन्यात करारनामा करुन पुरवठा आदेश निर्गत करणेत आलेला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

**सभा कामकाजात दाखल करून घेणेत आलेले विषय घेणेत आले.**

ठराव क्रमांक -२८५२ विषय क्रमांक - १८

दिनांक – २७/०६/२०१८

सूचक – मा.विलास मडिगेरी अनुमोदक – मा.करूणा चिंचवडे

संदर्भ – मा.विलास मडिगेरी, मा.करूणा चिंचवडे यांचा प्रस्ताव

मा.स्थायी समिती ठराव क्र.२४८५ दि.२१/३/२०१८ या ठरावामध्ये खालील प्रमाणे दुरूस्ती करणेत येत आहे

"दर महिन्याला ऑफिसर ऑफ द मन्थ (Officer of the month) घोषीत करावा व ही निवड करण्याचे अधिकार मा.आयुक्त यांनी कमिटी स्थापन करून स्वत: निर्णय घेण्यास" ऐवजी "मा.आयुक्त यांनी स्वत:निर्णय घेऊन प्रत्येक महिन्याला अर्ज न मागवता योग्य त्या अधिका-याची निवड करण्याचे अधिकारास मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता कार्यवाही करण्यात यांवी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२८५३ विषय क्रमांक - १९

दिनांक – २७/०६/२०१८

सूचक – मा.विकास डोळस अनुमोदक – मा.राजू मिसाळ

संदर्भ – मा.विकास डोळस, मा.राजू मिसाळ यांचा प्रस्ताव

प्रभाग क्र.१९ (नविन प्र.क्र.१६) पेठ क्र.२९ येथे फुटबॉल ग्राऊंड करणे या कामासाठी प्रकल्प सल्लागार नेमणूक करणे आवश्यक आहे. सबब प्रकल्पाची आवश्यकता पाहता फुटबॉल ग्राऊंड विकसीत करणेकरिता मे.शिल्पी आर्किटेक्ट्स यांना सदर कामाचा वास्तुविशारद सल्लागार (Architect) व प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (P.M.C.) म्हणुन नेमणुक करणेस व प्रकल्प तांत्रीक दृष्ट्या व यशस्वीपणे पुर्ण होणेकामी त्यांना याकरीता मनपाचे प्रचलित दरानुसार निविदापुर्व कामासाठी लघुत्तम निविदा दराच्या २.००% व निविदा पश्चात कामासाठी लघुत्तम निविदा दराचे १.३५% (सर्व करांसहीत) अशा प्रकारची फी अदायगी करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२८५४ विषय क्रमांक - २०
दिनांक – २७/०६/२०१८ विभाग – महिती व तंत्रज्ञान विभाग
सूचक – मा.राजेंद्र गावडे अनुमोदक – मा.विलास मडिगेरी
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मातंवि/१४/कावि/११/२०१८ दि.२२/०६/२०१८

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

महापालिकेमार्फत नागरीकांना देण्यात येणा-या सेवांमध्ये सुधारणा करणेसाठी शहर परिवर्तन कार्यालयामार्फत (CTO) नागरीकांचे सर्वेक्षण करण्याचे काम हाती घेण्यात आले आहे. यासाठी वेगवेगळ्या माध्यमातून सर्वेक्षण फॉर्मद्वारे नागरीकांचे मत घेवून त्याप्रमाणे धोरण निश्चित करणे आवश्यक आहे. यासाठी शहरातील नागरी सुविधा केंद्र कोपा/ पासाचे विद्यार्थी, स्वयंसेवक यांचे माध्यमातून हार्ड कॉपी व सॉफ्ट कॉपी मध्ये फॉर्म भरून घेवून सर्वेक्षणाचे कामकाज पुर्ण करावयाचे आहे. यासाठी नागरी सुविधा केंद्रामार्फत २००० फॉर्म, कोपा/ पासाचे विद्यार्थ्यांमार्फत ५००० व स्वयेसेवकामार्फत ५००० या प्रमाणे फॉर्म भरून घेण्याचे उद्दीष्ट आहे. त्यानुसार वरील प्रत्येक फॉर्मचे कामासाठी र.रू.१५/- या प्रमाणे दर निश्चितकरून संबंधितांना मानधन अदा करणेकामी अंदाजे र.रू.१,८०,०००/- (अक्षरी र.रू. एक लाख ऐंशी हजार फक्त) खर्च अपेक्षित असून प्रति फॉर्म भरण्याचे कामासाठी र.रू.१५/- मानधन अदा करणेस व येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२८५५ विषय क्रमांक - २१
दिनांक – २७/०६/२०१८ विभाग – महिती व तंत्रज्ञान विभाग
सूचक – मा.विलास मडिगेरी अनुमोदक – मा.विकास डोळस
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मातंवि/१४/कावि/१२/२०१८ दि.२२/०६/२०१८

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या माहिती व तंत्रज्ञान विभागामार्फत City Transformation Office प्रकल्पांतर्गत Strategy Clarification Meeting या विषयाची कार्यशाळा दि २९ जून २०१८ ते शनिवार ३० जून २०१८ या कालावधीत गरुड माची, मुळशी येथे आयोजित करणेत येणार आहे. या कार्यशाळेसाठी मा.आयुक्त व सर्व विभागप्रमुख व पॅलॅडियम ग्रुपचे सदस्यांसह ५० लोक कार्यशाळेत सहभागी होणार आहेत. त्यासाठी रक्कम रु.१,९०,०१३/- तसेच इतर खर्च अंदाजे रक्कम रु.१५,०००/- असे एकुण रक्कम रुपये २,२५,०१३/- अथवा प्रत्यक्ष येणारा खर्च थेट पध्दतीने करणेस तसेच सदरचा खर्च रोखीने अदा करावयाचा असल्याने आगाऊ रक्कम, मुख्य

माहिती तंत्रज्ञान अधिकारी यांचे नावे अदा करणेस व सदरचा आगाऊ खर्च माहिती व तंत्रज्ञान विभागाकडील City Transformation Office या लेखाशिर्षातून खर्ची टाकणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२८५६ विषय क्रमांक - २२

दिनांक – २७/०६/२०१८ विभाग – वैद्यकिय मुख्य कार्यालय

सूचक – मा.विलास मडिगेरी अनुमोदक – मा.राजेंद्र गावडे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.वैद्य/०१/कावि/७२४/२०१८ दि.२२/०६/२०१८

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

सालाबादप्रमाणे सन २०१८ मध्ये जगदगुरु संत तुकाराम महाराज व संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज यांच्या पालख्या आषाढी वारीसाठी पंढरपुर येथे दाखल होणेकरीता अनुक्रमे दि.०६/०७/२०१८ व ०७/०७/२०१८ रोजी पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीत प्रवेश करणार आहेत. पालख्या सोबत मोठ्या प्रमाणात नागरिक, वारकरी भाविक सामील होतात. पालखी सोबत असणा-या नागरिक व वारक-यांना ऊन-पावसापासुन तसेच नैसर्गिक आपत्तीपासुन संरक्षण व्हावे व त्यांचे आरोग्य निरोगी रहावे, याकरीता पालखी सोबत ॲम्बुलन्सची व्यवस्था व त्याबरोबरच वैद्यकीय पथकाची सोय करण्यात आलेली आहे. उक्त कालावधीत वारक-यांसाठी मोफत वैद्यकिय सुविधा २४ तास उपलब्ध करुन देणेबाबत मा. आयुक्त सो. यांनी दि.०७/०६/२०१८ रोजी झालेल्या बैठकीमध्ये समक्ष सुचना दिलेल्या आहेत. दि.०६/०७/२०१८ व दि.०७/०७/२०१८ रोजी जगद्गुरु संत तुकाराम महाराज यांची पालखी मनपा कार्यक्षेत्रामधील आकुर्डी येथे मुक्कामी असते. सदरवेळी वारक-यांना मनपाचे रुग्णालयामार्फत मोफत वैद्यकीय सेवा व उपचार देण्यात येतात. पालखी सोहळ्यामध्ये सहभागी होणा-या वारक-यांना सालाबादप्रमाणे वैद्यकीय सुविधा मोफत देणे आवश्यक असलेने एक तातडीची व विशेष बाब म्हणुन वारक-यांना मोफत वैद्यकिय सुविधा देणेस तसेच मनपाचे सर्व दवाखाने व रुग्णालयांमार्फत वारक-यांना मोफत वैद्यकीय सेवा-सुविधा दिलेनंतर येणा-या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२८५७ विषय क्रमांक - २३

दिनांक – २७/०६/२०१८ विभाग – स्थापत्य (EWS) प्रकल्प

सूचक – मा.अर्चना बारणे अनुमोदक – मा.यशोदा बोईनवाड

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.स्था/(EWS)प्र/०१/४१३/२०१८ दि.२२/०६/२०१८

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमार्फत पंतप्रधान आवास योजने अंतर्गत मौजे आकुर्डी येथील आरक्षण क्र.२८३ बेघरांसाठी घरे (HDH) येथील जागेवर आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी (EWS) घरकुल योजना राबविणेचे काम चालू आहे. सदर प्रकल्पाकरिता Environmental Clearance घेणे आवश्यक आहे. मा.स्थायी समिती ठराव क्र.२४३७, दि.२१/०३/२०१८ अन्वये PMAY प्रकल्पासाठी पर्यावरण सल्लागार म्हणून मे.ग्रीन सर्कल इं. यांची नेमणूक करण्यात आलेली आहे. सदर प्रकल्पाचे Environmental Clearance बाबत MPCB विभागाकडे ऑनलाईन अर्ज सादर करावा लागणार आहे. त्यासाठी महाराष्ट्र शासन, पर्यावरण विभाग यांचेकडील दि.०६/०६/२०१८ चे शासन निर्णय अन्वये Environmental Clearance Scrutiny करिता फी र.रु.४,००,०००/- (अक्षरी र.रु.चार लाख फक्त) पर्यावरण विभागाकडे RTGS/ NEFT द्वारे भरणेचे आहे. तरी प्रकल्प सल्लागार यांनी कळविलेनुसार सदर प्रकल्पास Environmental Clearance मिळणेकामी फी र.रु.४,००,०००/- (अक्षरी र.रु. चार लाख फक्त) इतकी RTGS/ NEFT द्वारे SEIAA/SEAC SECRETARIAT यांचेकडे अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२८५८ विषय क्रमांक - २४

दिनांक – २७/०६/२०१८ विभाग – स्थापत्य (BSUP) प्रकल्प

सूचक – मा.सागर आंगोळकर अनुमोदक – मा.विकास डोळस

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.स्था/(BSUP)प्र/४१४/२०१८ दि.२२/०६/२०१८

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

JnNURM-BSUP शहर झोपडपट्टी पुनर्वसन अंतर्गत लिंकरोड पत्राशेड, चिंचवड येथे ३३६ निवासी गाळे बांधणे (प्रकल्प ७अ) व ३३६ निवासी गाळे बांधणे (प्रकल्प ८अ) असे एकुण ६७२ गाळे बांधणेचे काम सुरु आहे. सदर प्रकल्पांतर्गत पॅकेज क्र.७अ येथे ३ इमारती व पॅकेज क्र.८अ येथे २ इमारती असे एकुण ५ इमारती (५६० सदनिका) बांधण्यात आलेले आहे. प्रकल्पास जनहित याचिका क्र.७४/२०१३ अन्वये मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी दि.०९/०७/२०१४ चे आदेशानुसार Environmental Clearance नसल्याने स्थगिती दिलेली आहे. त्यानुसार सदर प्रकल्पाचे काम जैसे थे परिस्थिती मध्ये बंद असून त्यांचे लाभार्थ्यांना हस्तांतरण करता येत नाही. मा.उच्च न्यायालय,

मुंबई यांचे दि.०४/०४/२०१८ चे आदेशानुसार सदर प्रकल्पाचे क्षेत्रफळ २०००० चौ.मी. पेक्षा जास्त नसल्याने शासनाच्या पर्यावरण प्राधिकरणाकडून अर्ज करुन त्यांच्याकडून आवश्यक स्पष्टीकरण/ खुलासा घेण्यात यावे असे निर्देश दिलेले आहेत. त्यामुळे सदर प्रकल्पाकरिता Environmental Clearance घेणे आवश्यक आहे. सदर प्रकल्पाचे Environmental Clearance बाबत MPCB विभागाकडे ऑनलाईन अर्ज सादर करावा लागणार आहे. त्यासाठी महाराष्ट्र शासन, पर्यावरण विभाग यांचेकडील दि.०६/०६/२०१८ चे शासन निर्णय अन्वये Environmental Clearance Scrutiny करिता (पॅकेज क्र. ७अ करिता र.रु.१,५०,०००/- व ८अ करिता र.रु.१,५०,०००/-) असे एकुण र.रु.३,००,०००/- फी पर्यावरण विभागाकडे RTGS / NEFT द्वारे भरणेचे आहे. तरी शासन निर्णयानुसार सदर प्रकल्पास (पॅकेज क्र.७अ व ८अ) Environmental Clearance मिळणेकामी एकुण र.रु.३,००,०००/- (अक्षरी र.रू. तीन लाख फक्त) इतकी फी RTGS/NEFT द्वारे SEIAA/SEAC SECRETARIAT यांचेकडे अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२८५९ विषय क्रमांक - २५

दिनांक – २७/०६/२०१८ विभाग – स्थापत्य (EWS) प्रकल्प

सूचक – मा.साधना मळेकर अनुमोदक – मा.अर्चना बारणे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.स्था/EWSप्र/४20/२०१८ दि.२२/०६/२०१८

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमार्फत पंतप्रधान आवास योजनेअंतर्गत मौजे रावेत स.नं.९६पै, आरक्षण क्र.४/१०२ येथील जागेवर आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी (EWS) घरकुल योजना राबविणेचे काम चालू आहे. सदर प्रकल्पाकरिता Environmental Clearance घेणे आवश्यक आहे. मा.स्थायी समिती ठराव क्र.२४३७, दि.२१/०३/२०१८ अन्वये PMAY प्रकल्पासाठी पर्यावरण सल्लागार म्हणून मे.ग्रीन सर्कल इं. यांची नेमणूक करण्यात आलेली आहे. सदर प्रकल्पाचे Environmental Clearance बाबत MPCB विभागाकडे ऑनलाईन अर्ज सादर करावा लागणार आहे. त्यासाठी महाराष्ट्र शासन, पर्यावरण विभाग यांचेकडील दि.०६/०६/२०१८ चे शासन निर्णय अन्वये Environmental ClearanceScrutiny करिता फी र.रु.४,००,०००/- (अक्षरी र.रु.चार लाख फक्त) पर्यावरण विभागाकडे RTGS / NEFT द्वारे भरणेचे आहे. तरी प्रकल्प सल्लागार यांनी कळविलेनुसार सदर प्रकल्पास Environmental Clearance मिळणेकामी फी र.रु.४,००,०००/- (अक्षरी र.रु. चार लाख फक्त) इतकी RTGS/NEFT द्वारे SEIAA/SEAC SECRETARIAT यांचेकडे अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक -२८६०
विषय क्रमांक - २६
दिनांक – २७/०६/२०१८
विभाग – लेखा विभाग
सूचक – मा.साधना मळेकर
अनुमोदक – मा.अर्चना बारणे
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.लेखा/१अ/कावि/Q/२०१८ दि.२७/०६/२०१८

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ६८ व ६९ नुसार आदेश क्र.लेखा/१अ/कावि/५७२/२०१८ दि. २३/५/२०१८ अन्वये विभागप्रमुख/ शाखाप्रमुख यांना प्रदान केलेल्या वित्तीय अधिकार आदेशात प्रस्तावात नमूद प्रमाणे दुरूस्ती करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२८६१
विषय क्रमांक - २७
दिनांक – २७/०६/२०१८
विभाग – उद्यान विभाग
सूचक – मा.विकास डोळस
अनुमोदक – मा.सागर आंगोळकर
संदर्भ – मा.अति. आयुक्त यांचे जा.क्र.उद्यान/४/कावि/३०६/२०१८ दि.२०/०६/२०१८

मा.अति. आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वृक्षसंवर्धन विभागामार्फत चिखली नर्सरी व से.नं 27 या ठिकाणी मनपा ने पुरविलेल्या 10*16 व 5*6 पिशव्या मध्ये शेडमध्ये माती भरुन 50 ते 100 मीटर वर असणा-या बेडमध्ये व्यवस्थित लावुन देणेकामी निविदा नो.क्र.13/2/2012-13 अन्वये प्रस्तुतकामासाठी अंदाजपत्रकीय र.रु.7,07,176/- अंदाजपत्रकिय दरापेक्षा (18.66 टक्के ने कमी) दराची निविदेसाठी मा.स्थायी समिती सभेची ठराव क्र.3512 दि.11/6/2013 अन्वये मान्यता घेवुन आदेश क्र.उद्यान/4/कावि/190/2013 दि.21/5/2013 नुसार मे.प्रियांका एंटरप्रायझेस यांना आदेश देण्यात आला आहे. व कामकाज करुन घेण्यात आले आहे. त्याअनुषंगाने मे. प्रियांका एंटरप्रायझेस यांनी सदर कामाचा पुरवठा करताना कामाच्या आवश्यकते प्रमाणे एकुण र.रु.44,437/- इतक्या रकमेचे जादा काम केले आहे. त्याकामी सदर रक्कम जादा केल्याने जादा झालेल्या र.रु.44,437/- (अक्षरी र.रू. चव्वेचाळीस हजार चारशे सदोतीस फक्त) इतक्या रकमेसाठी कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२८६२ विषय क्रमांक - २८

दिनांक – २७/०६/२०१८

सूचक – मा.राजेंद्र गावडे अनुमोदक – मा.राजू मिसाळ

संदर्भ – मा.राजेंद्र गावडे, मा.राजू मिसाळ यांचा प्रस्ताव

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या प्राथमिक विद्यालयातील प्रत्यक्ष हजर विद्यार्थ्यांना इ. १ ली ते ७ वी साठी शालेय वह्या मे.सनराज प्रिंटपॅक इंडस्ट्रीज चाकण, पुणे आणि पावसाळी साधने (रेनकोट) मे.सुपर प्लास्टीक कॉर्पोरेशन, मुंबई यांच्याकडून व शालेय दफ्तरे मे.लकी प्लास्टिक, मुंबई यांच्याकडून आणि सर्वांगिक शैक्षणिक गुणवत्ता विकास उपक्रमांअंतर्गत प्रयोगवही, भूगोल नकाशा वही, चित्रकला वही, व व्यावसायमाला व स्वाध्यायमाला अंतर्गत विविध अभ्यासपूरक पुस्तके बालवाडी व इ.१ ली ते ७ वी विद्यार्थ्यांना तसेच माध्यमिक विद्यालयातील प्रत्यक्ष हजर विद्यार्थ्यांना क्रमिक पुस्तका व्यतिरिक्त विविध उपक्रमा अंतर्गत प्रयोगवही, भूगोल नकाशा वही, चित्रकला वही व इतर नोंद वह्या खरेदी करणेकामी मे.कौशल्या पब्लिकेशन, पुणे यांच्याकडून यापूर्वी प्राथमिक शिक्षण विभागा मार्फत झालेल्या करारनाम्यानुसार शालेय विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्यांची गैरसोई होवू नये म्हणून १५ जून पासून पुरविणे आवश्यक असलेने यापूर्वी करारनाम्यानुसार उपरोक्त नमूद झालेल्या मागील पुरवठा धरकाकडून सदरचे साहित्य त्यास कोणत्याही प्रकारची दरवाढ न करता मागील वर्षाच्या मंजूर लघुत्तम दराने केलेला करारनामा व पुरवठा आदेशातील अटी शर्तीनुसार सन २०१८ – १९ साला साठी पुरवठा आदेश देवून प्रस्तावात नमूद प्रमाणे साहित्य खरेदी करण्यास व त्याकामी येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठरावा प्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२८६३ विषय क्रमांक - २९

दिनांक – २७/०६/२०१८

सूचक – मा.सागर आंगोळकर अनुमोदक – मा.विलास मडिगेरी

संदर्भ – मा.सागर आंगोळकर, मा.विलास मडिगेरी यांचा प्रस्ताव

मा.स्थायी समिती ठराव क्र.२८०१ दि.१३/६/२०१८ च्या ठरावामध्ये खालील प्रमाणे दुरूस्ती करणेस मान्यता देणेत येत आहे प्रस्तुत ठरावामध्ये नमुद केलेनुसार महारेरा अंतर्गत मौजे च-होली येथील EWS गृहप्रकल्पाचे रजिस्ट्रेशन करणेकामी महारेरा यांच्याकडील २,१५,८८५/- या रकमचे अद्यावत चलन प्राप्त झाले असून त्यानुसार सदर ठरावामध्ये र.रू.२,१५,०००/- या रकमे ऐवजी र.रू.२,१५,८८५/- अशी दुरूस्ती करून त्याप्रमाणे ररू.२,१५,८८५/- इतकी रक्कम

रजिस्ट्रेशन फी म्हणून अदा करणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठरावा प्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले

**(ममता विनायक गायकवाड)**
**सभापती**
स्थायी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११ ०१८ नगरसचिव विभाग,
क्रमांक - नस/३/कावि/८२४/२०१८
दिनांक - २८/०६/२०१८



**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

प्रत - सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे
पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.

(क्र.फक्षेका/नि-४/कावि/२७८/२०१८, दि.०५/०५/२०१८ विषय क्र.१० चे लगत)

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, फ क्षेत्रीय कार्यालय, निगडी -44
(विषयपत्र क्र.फक्षेका/नि-4/कावि/278/2018 दि.5/05/2018 लगत)
प्रपत्र " अ "

| अ.क्र. | ठेकेदाराचे नाव | निविदा क्रमांक | कामाचे नाव | करारनामा केलेची तारीख | कामाचा आदेश क्रमांक | कामाचा आदेश दिनांक | निविदा रक्कम | स्विकृत दर | निविदा खर्चाची मान्यतेची रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | मे.एस बी काळे | 5/6/2017-18 | प्रभाग क्र.4 कृष्णानगर परिसरात ठिकठिकाणी पाथवेसाठी पेव्हींग ब्लॉक बसविणे. | 16/03/2018 | फक्षेका/नि-4/कावि/233/2018 | 31/03/2018 | 896359 | -24.10% कमी | 680336 |
| 2 | मे.बहिरट ब्रदर्स | 5/2/2017-18 | प्रभाग क्र.28 मासुळकर कॉलनी यशवंतनगर परिसरातील डांबरी रस्त्याची दुरुस्ती करणे. | 16/03/2018 | फक्षेका/नि-4/कावि/270/2018 | 3/05/2018 | 924370 | -17.51% कमी | 762513 |
| 3 | मे.बहिरट ब्रदर्स | 5/7/2017-18 | प्रभाग क्र.4 कृष्णानगर परिसरातील रस्त्यांचे डांबरीकरण करणे. | 16/03/2018 | फक्षेका/नि-4/कावि/269/2018 | 3/05/2018 | 924370 | -15.51% कमी | 781000 |
| 4 | मे.एस व्ही सातपुते डेव्हलपर्स & बिल्डर्स | 6/3/2017-18 | प्रभाग क्र.12 मध्ये विविध ठिकाणी स्थापत्य विषयक कामे करणे. | 24/04/2018 | फक्षेका/नि-4/कावि/277/2018 | 5/05/2018 | 924013 | -29.07% कमी | 655402 |
| 5 | मे.आर्यन एंटरप्रायजेस | 6/5/2017-18 | प्रभाग क्र.12 मध्ये स्वच्छ भारत अभियानाअंतर्गत राडारोडा उचलणे. | 24/04/2018 | फक्षेका/नि-4/कावि/271/2018 | 5/05/2018 | 924347 | -25.01% कमी | 693168 |
| | | | | | | एकुण | 4593459 | | 3572419 |

क्षेत्रिय अधिकारी
फ क्षेत्रिय कार्यालय
पिंपरी चिंचवड महानगरपालिका